आगच्छत् शिक्षार्थम्। निर्गच्छत् सेवार्थम्।

# महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा) औरंगाबाद

# School Leadership Academy, Maharashtra

# मोड्यूल क्र .४२

## YouTube च्या माध्यमातून मार्गदर्शक व्हिडीओ निर्मिती मध्ये शालेय नेतृत्वाची भूमिका

## The Role of School Leadership in creating Instructional Videos through YouTube

तंत्रज्ञानाची ओळख आणि त्याचा वापर आज प्रत्येकासाठी गरजेचा झाला आहे. कोरोना काळात तर तंत्रज्ञानामुळे अनेक कामे सहज सोपी होण्यास मदत झाली. त्यामुळे तंत्रज्ञान व इंटरनेटचे महत्त्व पुन्हा अधोरेखित झाले. शिक्षणात अधिक सहजता यावी यासाठी तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला, कोरोना काळात शाळा बंद झाल्या मात्र विद्यार्थ्यांचे शिक्षण थांबू नये या उद्देशाने ऑनलाइन शिक्षण सुरू झाले या संदर्भातील विविध संकल्पना, नियम प्रक्रिया, विद्यार्थ्यांना सुलभ व्हावी यासाठी अनेक व्हिडिओ युट्युब वर उपलब्ध आहेत.

आजची पिढी ही तंत्रज्ञानाच्या प्रेमात पडलेली आहे. नव्हे लहानपणापासूनच ती तंत्रज्ञानाशी खेळू लागली आहे. त्यांचे मनोरंजनाचे साधनही तंत्रज्ञानच आहे. तर मग हेच तंत्रज्ञान आपण आपल्या बालकांच्या अध्ययन - अध्यापनाचे साधन होईल यासाठी थोडा प्रयत्न केला तर विद्यार्थी स्वत: च्या आवडीने, निवडीने, गतीने आणि सवडीने शिकतील. अश्याच एका माध्यमाचा – YouTube channel चा वापर शिक्षण प्रक्रियेत यशस्वीरित्या होऊ शकतो. याबाबत या मोड्यूल मध्ये माहिती विषद केली आहे.

### YouTube Channel चा इतिहास -

YouTube ची स्थापना 14 फेब्रुवारी 2005 मध्ये ती स्टीवचेन, चाड हरले जावेद करीम यांनी केली . हरले यांनी पेन्सिल्वेनियाच्या इंडियाना विद्यापीठात डिझाईनचा अभ्यास केला होता आणि चेन व करीम यांनी अरबाना चॅम्पियन येथील एलीनॉय विद्यापीठात संगणक विज्ञानाचा एकत्र अभ्यास केला होता . गुगल नंतर सर्वात जास्त वापरले जाणारे साधन म्हणजे युट्युब दर मिनिटाला YouTube वर जवळजवळ 400 तासांचे व्हिडिओ अपलोड केले जातात, दररोज YouTube वर पाच अब्ज पेक्षा जास्त व्हिडिओ पाहिले जातात. युट्युब हा अमेरिकेचा ऑनलाईन व्हिडिओ शेअरिंग प्लॅटफॉर्म आहे .

**विषयाची संकल्पना –**

YouTube हे एक ऑनलाइन शिक्षण घेण्यासाठी प्रभावी गुगलचे साधन आहे .त्यात वेगवेगळया विषयासंबंधी व्हिडिओज आपल्याला पाहायला मिळतात, हे गुगलचे मोफत साधन आहे. याच्या साह्याने पाहिजे असलेली माहिती YouTube सर्च बॉक्स मध्ये टाईप करून आपण त्या माहितीचे व्हिडिओ पाहू शकतो. हे दृक व श्राव्य स्वरूपात माहिती प्रसारित करण्याचे महत्त्वाचे साधन आहे. YouTube च्या साह्याने ऑनलाइन लाईव्ह क्लास सुद्धा घेण्याची सुविधा आहे ,तसेच कमेंट म्हणजेच टिप्पणी करण्याची सुविधा त्यात दिलेली आहे आणि वापरण्यासही खूप सोपे आहे .युट्युब चा वापर मोबाईल, स्मार्ट टीव्ही ,स्मार्टफोन ,कंप्यूटर , एलईडी एलसीडी यावर करता येतो त्यासाठी त्या उपकरणांना इंटरनेट जोडण्याची सुविधा आवश्यक असते.

संकटे माणसाला संधी देतात, नवनव्या गोष्टी करण्यास उद्युक्त करतात, वेगळी वाट चोखण्याची प्रेरणा देतात. कोरोना काळाने जणू याचीच प्रचिती दिली .या आव्हानात्मक परिस्थितीत माणसांपुढे कितीतरी संकटे निर्माण झाली मात्र त्यातूनच संधीचे आशादायक कवडसे ही प्रत्ययास आले. मुळात जीवनाच्या सर्व क्षेत्रावर कोरोनाने घाला घातला .शिक्षण हे महत्त्वाचे क्षेत्र देखील त्याला अपवाद उरले नाही .कोरोना काळात शाळा बंद झाल्या आणि अनेक प्रश्न उभे राहिले यातूनच विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याच्या दृष्टीने नवनव्या संकल्पना, नवनवे प्रयोग या काळात आकारास आले आणि त्यातूनच ऑनलाइन शिक्षणासारखे शब्द शैक्षणिक प्रवाहात रूढ झाले.

**मोड्यूल अध्ययनाची उद्दिष्टे -**

1.Youtube च्या माध्यमातून शिक्षण ही संकल्पना समजून घेणे.

2..शालेय शिक्षण विभागाअंतर्गत शासन निर्णय ,परिपत्रके, शैक्षणिक धोरण यातील महत्त्वाच्या संकल्पना व प्रत्यक्ष अंमलबजावणी साठी मार्गदर्शक व्हिडिओची उपयुक्तता समजून घेणे.

3.शासन निर्णय, परिपत्रके, शैक्षणिक धोरण यातील महत्त्वाच्या संकल्पना व प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी व्हिडिओ तयार करणे व YouTube चॅनल च्या माध्यमातून सर्वांना उपलब्ध करून देणे

4.Youtube चा शालेय शिक्षणात प्रभावी वापर याबाबत दृष्टिकोन विकसित करणे.

शासनामार्फत सुरू असणाऱ्या सर्व शैक्षणिक उपक्रम ,प्रशिक्षणे,कार्यक्रमांची अंमलबजावणी तालुकास्तरावर पंचायत समिती अंतर्गत शिक्षण विभागामार्फत करणे अनिवार्य असल्याने विषय साधनव्यक्ती योग्य अंमलबजावणीसाठी सतत प्रयत्नशील असतात. तंत्रज्ञानाचा वापर खऱ्या अर्थाने सर्वप्रथम श्री जगदाळे यांनी 2017-18 मध्ये सुरू केला. केंद्र शासनाचा भाषा संगम या 22 दिवसीय कार्यक्रमाची अंमलबजावणी बाबत सर्व राज्यांना निर्देश देण्यात आले होते ,त्यावेळी मुलांचा सहभाग वाढविण्यासाठी श्री जगदाळे यांनी सतराशे व्हिडिओ तयार केले त्याला प्रचंड प्रतिसाद प्राप्त झाला व या उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणी मध्ये महाराष्ट्रात जाफराबाद तालुका सर्वप्रथम होता. कोरोना काळात सतत ऑनलाईन कार्यक्रमांची अंमलबजावणी

सुरू होती कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडचणी येत होत्या ,अध्ययन प्रक्रिया सुरळीत व्हावी यासाठी शिक्षण विभागाने इयत्ता पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांना मागील वर्गाच्या महत्त्वाच्या विषयांची उजळणी घेण्याची तयारी केली तसेच 25% अभ्यासक्रम कमी करण्यात आला यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांनी 45 दिवसांचा सेतू अभ्यासक्रम तयार केला जो एस सी आर टी च्या वेबसाईट वरून डाऊनलोड करावा लागतो या उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी डायट मार्फत शिक्षकांच्या केंद्र,बिट तालुकास्तर कार्यशाळा घेण्यात आल्या या कार्यशाळेत श्री जगदाळे यांनी मार्गदर्शन केले कार्यशाळेनंतर शिक्षकांना अनेक अडचणी येऊ लागल्या तसतसे ते फोन व्हाट्सअप वर संपर्क करू लागले प्रत्येकाला एवढा वेळ देणे शक्य नसल्याने सेतू अभ्यासक्रम अंमलबजावणी कशी करावी याबाबत इयत्ता निहाय मार्गदर्शक व्हिडिओ बनवून लिंक द्वारे शिक्षकांना पाठवण्याबाबतचा विचार श्री जगदाळे यांनी केला आणि त्यानुसार एक व्हिडिओ बनवून YouTube ला अपलोड करण्यात आला ज्यात सेतू अभ्यासक्रमात शिक्षकाची भूमिका याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

त्यातूनच अभ्यासक्रम अंमलबजावणी बाबतचा मार्गदर्शन पर व्हिडिओ बनविण्याचा विचार केला अभ्यासक्रमातील निर्देशित माहितीनुसार प्रत्येक पायरीनुरूप व्हिडीओ तयार करण्यात आला व त्यातूनच सेतू अभ्यासक्रमामध्ये शिक्षकाची भूमिका याबाबत मार्गदर्शन केले या व्हिडिओला खूप मोठा प्रतिसाद मिळाला. सुरुवातीच्या दोन दिवसात व्हिडिओला 5000 व्ह्यूज प्राप्त झाले.कारण ज्या ज्या शिक्षकांनी हा व्हिडिओ पाहिला त्यांनी व्हाट्सअप ग्रुप मध्ये संपूर्ण जिल्ह्यात शेअर केला .शिक्षकांना व्हिडिओ पाहिल्यानंतर आणखी काही शंका निर्माण झाल्या,नोंदी कशा ठेवाव्यात रोजचा अभ्यासक्रम मुलांना कसा द्यावा ?? अशा पद्धतीने अनेक प्रश्न शिक्षकांसमोर होते. एक जुलै 2021 ते 15 ऑगस्ट असा 45 दिवसांचा सेतू अभ्यासक्रम राबवला गेला त्यात दररोज इयत्ता निहाय नवीन संबोध स्पष्टीकरण असायचे दुसरी ते सहावी या इयत्तांचे सुरुवातीला मार्गदर्शनपर व्हिडिओ बनविले मात्र नववी दहावीचे शिक्षक ही मागणी करू लागले त्यामुळे आठवी ते दहावीच्या अभ्यासक्रमाचे व्हिडिओ बनविले .खरे तर व्हिडिओ विद्यार्थ्यांसाठी असायचे मात्र शिक्षकही खूप प्रतिसाद देत होते रोज किमान दहा हजार व्ह्यूज सेतू अभ्यासक्रमाच्या व्हिडिओला असायचे. आशा प्रकारे YouTube व्हिडीओ च्या माध्यमातून विद्यार्थी शिक्षक मुख्याध्यापकांपर्यंत जाण्याचा प्रयत्न केला, त्यातून त्यांच्या शंका सोडविणे, शासन निर्णयाची, शैक्षणिक कार्यक्रम उपक्रमांची, प्रशिक्षणांची अंमलबजावणी करण्यासाठी जास्तीत जास्त सुकरता आणणे हा महत्त्वाचा उद्देश डोळयासमोर ठेवून सदर व्हिडिओ तयार करण्यात आले ज्याला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. त्यातूनच फक्त शिक्षण हे यूट्यूब चैनल सुरू करण्यात आले , यावर खालील प्रमाणे अनेक व्हिडिओ आहेत ज्याचा उपयोग विद्यार्थी शिक्षक मुख्याध्यापक करत आहेत

**बदलत्या काळानुसार आपण आपल्यात हा बदल करणे गरजेचे**

एक विषय साधनव्यक्ती म्हणून शाळा भेट करत असतांना वर्ग चौथीचा असो की वर्ग दहावीचा असो वर्गामध्ये विद्यार्थ्यांशी संवाद साधत असतांना एक बाब प्रकर्षाने जाणवली ती म्हणजे समजा विद्यार्थी अभ्यास करत आहेत त्या दिवशी शाळेला सुट्टी आहे आणि विद्यार्थ्यांना एखादी संकल्पना समजली नाही किंवा त्या

संकल्पनेविषयी विद्यार्थ्यांच्या मनामध्ये काही संभ्रम असेल तर अशा वेळेस विद्यार्थी काय करतात? ती संकल्पना समजून घेण्यासाठी कोण कोणत्या साधनांचा वापर करतात? हे समजून घेण्याचा प्रयत्न केला. तेव्हा ९०% विद्यार्थ्यांकडून असा प्रतिसाद मिळाला की, आम्ही युट्युब वर जाऊन त्या संकल्पनेविषयी त्या संबोधाविषयी शोध घेतो.

जर विद्यार्थी आपल्याला आलेल्या अडचणी विषयी, आपला संबोध स्पष्ट करण्यासाठी जर युट्युब वर जाऊन जर माहिती शोधत असतील आणि ती संकल्पना समजून घेत असतील तर शिक्षण यंत्रणेतला एक घटक या नात्याने आपण अशा संकल्पना, संबोधाचे नक्कीच छोटे –छोटे व्हिडिओ तयार करून युट्युब वर अपलोड करणे गरजेचे आहे. त्याला विद्यार्थ्यांचा देखील प्रतिसाद असतो. यातूनच व्हिडीओ निर्मिती कार्य सुरु झाले.

**'Fakt Shikshan' YouTube Channel वर उपलब्ध व्हिडीओ -**

आजची बालके जर तंत्रज्ञानाशी खेळतात तर त्यांचे या तंत्रज्ञानाशी खेळता खेळता अध्ययन व्हावे यासाठी 'फक्त शिक्षण' या युट्युब चॅनलच्या माध्यमातून खालील प्रमाणे वेगवेगळ्या प्रकारचे व्हिडीओ तयार करण्यात आले आहेत.

**विद्यार्थ्यांसाठी YouTube च्या माध्यमातून मार्गदर्शन -**

विद्यार्थ्यांसाठी खालील घटकांवर १ हजारपेक्षा जास्त व्हिडीओ तयार करण्यात आले आहेत.

| अ.क्र. | घटकाचे नाव | एकूण व्हिडीओ | एका व्हिडीओची लिंक | Views |
|---|---|---|---|---|
| 1 | सेतू अभ्यासक्रम | 167 | https://youtu.be/MvQTslqRKBw | 167325 |
| 2 | Online स्वाध्याय | 279 | https://youtu.be/jCIQqg8OITA | 200791 |
| 3 | १०० दिवस वाचन अभियान | 12 | https://youtu.be/i_s_AzVdPWA | 68040 |
| 4 | वेगवेगळया दिनांविषयी माहिती | 52 | https://youtu.be/INDSgMMsTQo | 97942 |
| 5 | शास्त्रज्ञांची माहिती | 33 | https://youtu.be/xaIM-PWcaQM | 62949 |
| 6 | परमवीर चक्र विजेत्यांची माहिती | 21 | https://youtu.be/Kb2rmH6DgFI | 31290 |
| 7 | ऑलिम्पिक पदक विजेते माहिती | 20 | https://youtu.be/QW5Kc2KjbWY | 27458 |
| 8 | भाषा व्याकरण | 11 | https://youtu.be/uPJOOk1xBTk | 15032 |
| 9 | शुध्दलेखन नियम | 7 | https://youtu.be/78QFHYWlttY | 7532 |
| 10 | पुनर्रचित सेतू अभ्यासक्रम २०२२ | 156 | https://youtu.be/bbXbZRZZRDw | 2066383 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 11 | अध्ययन निष्पत्तीनुसार सराव चाचण्या व सत्र परीक्षा | 71 | https://youtu.be/ynG0lR-JuZs | 1510109 |
| 12 | अभ्यास करण्यासाठी सोप्या कृती | 3 | https://youtu.be/1iaYbWSnp5o | 2807 |
| 13 | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव | 3 | https://youtu.be/lqHkJ1hwOEM | 4109 |
| 14 | १० वी सराव परीक्षा पेपर | 14 | https://youtu.be/YHpMW95ZfgY | 129763 |
| 15 | ५ वी ते १२ वी वाक्प्रचार | 7 | https://youtu.be/CinfBKNHUmI | 54829 |
| 16. | NAS परीक्षा मार्गदर्शन मागील प्रश्नपत्रिका उत्तरासह | | https://youtu.be/jX-lkH1lkZ4 | 744885 |
| 17 | नवोदय परीक्षा मार्गदर्शन | 3 | https://youtu.be/wwhxO7zdCFA | 2207 |
| 18 | ५वी ८ वी शिष्यवृत्ती तयारी संदर्भात माहिती | 10 | https://youtu.be/R0EHR2ocZlA | 42468 |
| 19 | झालेल्या स्पर्धा परीक्षांची उत्तर सूची | 11 | https://youtu.be/tBX_djk4fH8 | 20261 |
| 20 | SLAS परीक्षांचे प्रश्नपत्रिकेचे स्वरूप | 20 | https://youtu.be/EGhznt8NiBI | 203638 |
| 21 | विद्यार्थी App बद्दल माहिती.उदा.READ TO ME STUDENT APP | 12 | https://youtu.be/v80ejeunijY | 34971 |
| 22 | विद्यार्थी App मधील समस्येवर उपाय उदा.स्वाध्याय APP | 3 | https://youtu.be/_M89ePY3M4Y | 1793 |

आतापर्यंत एकूण **५४९६५८८** Views विद्यार्थीच्या व्हिडीओला प्राप्त झाले आहेत.

**मुख्याध्यापकांसाठी शिक्षकांसाठी YouTube च्या माध्यमातून मार्गदर्शन -**

शिक्षक व मुख्याध्यापकांसाठी खालील घटकांवर १ हजारपेक्षा जास्त व्हिडीओ तयार करण्यात आले आहेत.

| अ.क्र. | घटकाचे नाव | एकूण व्हिडीओ | एका व्हिडीओची लिंक | Views |
|---|---|---|---|---|
| 1 | वेगवेगळ्या Online प्रशिक्षणास नोंदणी कशी करावी? | 17 | https://youtu.be/6WsfAnLzZT0 | 12874 |
| 2 | प्रशिक्षणात येणाऱ्या समस्यांवर उपाय | 6 | https://youtu.be/GNEmITC6t-E | 9803 |
| 3 | NEP २०२० संदर्भात सविस्तर माहिती | 7 | https://youtu.be/SUNQ-18A5fg | 10960 |
| 4 | FLN मध्ये शिक्षक भूमिका? | 7 | https://youtu.be/JV0NQC0cZOQ | 54084 |
| 5 | आपल्या वर्गाचा अध्ययन स्तर निश्चित कसा करावा? | 6 | https://youtu.be/D5j_WxUhDa8 | 9682 |
| 6 | अध्ययन स्तरानंतर प्रत्यक्ष कृती कार्यक्रम तयार केल्याची उदाहरणे | 3 | https://youtu.be/ZnYfD1U4j2k | 18037 |
| 7 | आठवडानिहाय कृती कार्यक्रम देणे | 22 | https://youtu.be/XU8vl4_JzVo | 42984 |
| 8 | अध्ययन निष्पत्ती विषयी मार्गदर्शन | 4 | https://youtu.be/a3yvtPCD0ac | 28193 |
| 9 | अध्ययन निष्पत्तीनुसार प्रश्नपत्रिका कशा तयार कराव्यात | 21 | https://youtu.be/PKcKshSZbRU | 33764 |
| 10 | Student Portal कसे भरावे? अपडेट कसे करावे? | 5 | https://youtu.be/q7wHdz9z84I | 23273 |
| 11 | U-DISE वर माहिती भरणे? समस्यावर उपाय | 13 | https://youtu.be/yNTf0keBxi4 | 43496 |
| 12 | शाळापूर्व तयारी विषयी मार्गदर्शन | 49 | https://youtu.be/vyIhtRFGLtk | 182337 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 13 | FLN अंतर्गत माता पालकांचे गट कसे करावेत? | 1 | https://youtu.be/rG7mrCOt2CM | 36829 |
| 14 | विद्यांजली कार्यक्रम | 6 | https://youtu.be/0cXgdjk0mrQ | 56744 |
| 15 | स्वच्छ भारत मध्ये कशी करावी? माहिती कशी भरावी? | 7 | https://youtu.be/Vp--KUyhryU | 58320 |
| 16 | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव | 11 | https://youtu.be/dc3JljZHWUk | 49302 |
| 17 | शिक्षक पर्व -विविध अध्यापन पध्दती | 7 | https://youtu.be/NdIGvR-RSKA | 54563 |
| 18 | PFMS प्रणाली विषयी मार्गदर्शन | 12 | https://youtu.be/bXtwWBqulUI | 82142 |
| 19 | शाळाबाह्य विद्यार्थी सर्वेक्षण कसे करावे? | 2 | https://youtu.be/U7w-kqwLGfA | 1189 |
| 20 | विविध सर्वेक्षणाची माहिती Online कोठे आणि कशी भरावी? | 9 | https://youtu.be/2HjMvRLL0r8 | 18239 |
| 21 | शाळा व्यवस्थापन समितीचे पूनर्गठण कसे करावे? | 1 | https://youtu.be/P4lBuTtROlw | 6915 |
| 22 | शाळा व्यवस्थापन समितीची कर्तव्य व जबाबदाऱ्या | 5 | https://youtu.be/3RtSVB2kETY | 21245 |
| 23 | शाळा सिध्दी | 14 | https://youtu.be/hHEky6mP5gc | 24296 |
| 24 | निपुण भारत मध्ये SMC ची भूमिका | 2 | https://youtu.be/r012x7AXPf8 | 4559 |
| 25 | PM Shri Schools योजनेत शाळा नोंदणी कशी करावी | 6 | https://youtu.be/oM7KbLzQpS4 | 13238 |
| 26 | शिक्षक-मुख्याध्यापकांसाठी उपयुक्त वेबसाईटसची माहिती | 3 | https://youtu.be/BdiiGcxGqgs | 4512 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 27 | शिक्षकांनी READ TO ME APP वर नोंदणी कशी करावी? | 4 | https://youtu.be/CNLHsvcdfkI | 3795 |
| 28 | राज्याहून प्राप्त कोणते साहित्य कसे वापरावे? | 3 | https://youtu.be/l3pdZLD94RQ | 16452 |
| 29 | दीक्षा ॲपची शिक्षकांनी वापर कसा करावा? | 4 | https://youtu.be/eWJf8U2nNSw | 15189 |
| 30 | अध्यापन पध्दती नुसार प्रत्यक्ष नमुना तासिका | 3 | https://youtu.be/E-E6JPJ4bvQ | 21581 |
| 31 | NAS,SLAS मार्गदर्शन | 8 | https://youtu.be/NTU4ZU41Tkk | 172218 |

आतापर्यंत एकूण **११३०८१५** Views शिक्षक व मुख्याध्यापक व्हिडीओला प्राप्त झाले आहेत.

**पर्यवेक्षीय यंत्रणेसाठी YouTube च्या माध्यमातून मार्गदर्शन -**

'फक्त शिक्षण' युटयुब चॅनलवर जसे विद्यार्थी व शिक्षकांसाठी जसे व्हिडीओ तयार केले तसेच पर्यावेक्षीय यंत्रणेसाठीही काही व्हिडीओ तयार केले आहेत.

| **अ.क्र.** | **घटकाचे नाव** | **एकूण व्हिडीओ** | **एका व्हिडीओची लिंक** | **Views** |
|---|---|---|---|---|
| 1 | स्वच्छ शाळा मूल्यमापन कसे करावे? | 1 | https://youtu.be/Di3QmYr9ny0 | 1792 |
| 2 | शाळा सिध्दी बाह्य मूल्यमापन कसे करावे? | 7 | https://youtu.be/FMtumjePTcs | 31748 |
| 3 | शाळासिध्दी आपल्या कार्यक्षेत्रातील किती शाळांनी भरली कसे पहावे? | 3 | https://youtu.be/qZiJzWSp8t8 | 1752 |
| 4 | शिक्षण परिषदेत आदर्श तासिका | 2 | https://youtu.be/o_OKs6ScxI4 | 6657 |
| 5 | अध्ययन स्तर निश्चिती | 4 | https://youtu.be/SmFNwvl70TM | 5673 |
| 6 | अध्ययन निष्पत्तीनिहाय NAS प्रश्न तयार कसे करावेत? | 1 | https://youtu.be/jX-lkH1lkZ4 | 146482 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 7 | वेळोवेळी येणारे शैक्षणिक शासननिर्णय | 19 | https://youtu.be/tFTUZa8_8pA | 29537 |
| 8 | आदर्श शाळा भेट कशी करावी? | 2 | https://youtu.be/zizrzDpPyV8 | 1874 |
| 9 | NAS अहवाल विश्लेषण | 4 | https://youtu.be/QkbkMoBVKJs | 3863 |
| 10 | मिशन झिरोड्रॉपआऊट मध्ये पर्यवेक्षकांची भूमिका | 3 | https://youtu.be/LLhzXazRKdA | 9388 |
| 11 | विविध कार्यशाळेसाठी मार्गदर्शनपर व्हिडिओ | 23 | https://youtu.be/R0EHR2ocZlA | 71602 |
| 12 | शाळा व्यवस्थापन समिती प्रशिक्षण | 6 | https://youtu.be/Dce07Ck3dkc | 2572 |

आतापर्यंत एकूण **३१२९४०** Views पर्यवेक्षीय यंत्रणेसाठी टाकलेल्या व्हिडीओला प्राप्त झाले आहेत.

**FAKTSHIKSHAN YouTube channel वरील लाभ -**

श्री जगदाळे यांनी आतापर्यंत अनेक शैक्षणिक उपक्रम, शासननिर्णय, शैक्षणिक परिपत्रके यांच्या प्रभावी अंमलबजावणी साठी मार्गदर्शक व्हिडीओ बनवले आहेत.त्यांच्या FAKTSHIKSHAN या YOU TUBE चॅनेल च्या Viewers संख्या 75 लाख असून 78000 subscribers आहेत.सदर चॅनल पूर्णपणे मोफत आहे.

**'फक्त शिक्षण' चॅनलवरील व्हिडीओंचा लाभ कसा झाला -**

१. शास्त्रज्ञ, परमवीरचक्र विजेते व ऑलिम्पिक विजेते यांच्या जयंतीच्या हे व्हिडीओ विद्यार्थ्यांकडून पाहिले जातात. विद्यार्थ्यांना याचा लाभ होतो.
२.अध्ययन निष्पत्ती नुसार काढलेल्या चाचणी व सत्र परीक्षा यासाठी काढलेल्या कृतीपत्रिकाचे व्हिडीओ पाहून मोठया प्रमाणावर शाळांकडून प्रश्नपत्रिकांची मागणी होते.
३.विविध Online प्रशिक्षणास नोंदणी कशी करावी याच्या व्हिडीओंचा लाभ मोठ्या प्रमाणावर शिक्षक, मुख्याध्यापक व पर्यवेक्षीय यंत्रणेचे घटक घेतात.
४. वेगवेगळया सर्वेक्षणाची माहिती कोणत्या वेबसाईटवर भरावी, यासंदर्भातील व्हिडीओंचा लाभ मोठया प्रमाणावर घेतला जातो.
५. स्वच्छ शाळा मूल्यांकनासंदर्भात तयार केलेल्या व्हिडीओंचा लाभ मोठया प्रमाणावर मुख्याध्यापक व पर्यावेक्षीय यंत्रणेचे घटक घेतात.
६. NAS व्हिडीओंचा लाभही लाखो विद्यार्थ्यांनी घेतला आहे.
७. एकंदरीत सर्वच व्हिडीओंचा लाभ सर्व घटकांना झाला आहे.

**दृश्य परिणाम -**

'फक्त शिक्षण' चॅनलवरील व्हिडीओंचा लाभ घेतला त्याचा फायदा कसा झाला हे सांगतांना अगदी अकडेवारीत सांगता येत नाही. कारण तसे परिणाम मोजण्याचे कोणतेही साधन नाही. मात्र चॅनलवर लाभ तसेच वेगवेगळया व्हाटसअप ग्रुपवर व्हिडीओंना लाभार्थ्यांच्या मोठया प्रमाणावर सकारात्मक प्रतिक्रिया येतात. त्यातून अधीक काम करण्यास प्रोत्सहान मिळते. शिवाय अजून कोणत्या प्रकारच्या संबोधावर किंवा घटकांवर मदतीची गरज आहे हे लाभार्थी सूचवतात. तशा प्रकारचे व्हिडीओ तयार करून टाकले जातात.

**राज्याच्या अनेक योजना, शासन निर्णय, सर्वेक्षण कसे करावे याची माहिती सोप्या भाषेत दिली.**

राज्यातील विद्यार्थ्यांना लाभाच्या विविध योजना असो की, शिष्यवृत्ती असो त्याचा लाभ कोणाला मिळू शकेल? त्यासाठी पात्रता काय आहे? त्याच्यासाठी कोणकोणते कागदपत्रे लागतील? या सर्वासंबंधी माहिती व्हिडिओच्या माध्यमातून विद्यार्थी, पालक व शिक्षकांसाठी देण्यात येते. त्याचप्रमाणे शिक्षण विभागातील शासनाने घेतलेले शासन निर्णय पालक, विद्यार्थी व शिक्षकापर्यंत पोहोचवणे, त्या शासन निर्णयाचा सोप्या भाषेमध्ये त्यांना अर्थ समजून सांगणे, या शासन निर्णयाचा कोणाला आणि काय लाभ होईल हे सोप्या भाषेत समजावून सांगणे, हे व्हिडिओच्या माध्यमातून करण्यात येते. तसेच शासनाकडून शिक्षण विभांगार्तत वेळोवेळी वेगवेगळे सर्वेक्षण केले जातात. यामध्ये शाळाबाह्य विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण असो, शाळासिद्धी असो, की राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षण असो, की राज्य संपादणूक सर्वेक्षण असो हे नेमके कसे करायचे? यामध्ये मुख्याध्यापकाची भूमिका कोणती? शिक्षकाची भूमिका कोणती? तसेच जो सर्वेक्षण करणार आहेत त्या निर्धारकाची भूमिका कोणती? या सर्वांविषयी व्हिडिओच्या माध्यमातून सविस्तर माहिती देण्यात येते. हजारो, लाखो विद्यार्थी, शिक्षक हे व्हिडिओ बघतात त्याचा लाभ घेतात हे मागील १९ महिन्यापासून निरंतर सुरू आहे.

**फक्त शिक्षण युट्युब चॅनेलचा फायदा -**

फक्त शिक्षण युट्युब चॅनेलचा फायदा काय झाला? याचा विचार करत असतांना आपल्याला पुढील काही बाबी सांगता येतील.

१.विद्यार्थ्यांना हवे तेव्हा कोणत्याही वेळी त्यांना सहज मदत मिळते.

२.शिक्षण विभागातल्या नवनवीन संकल्पना पालक शिक्षकांपर्यंत मोठ्या समूहापर्यंत सहज पोहोचतात.

३.विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी नियोजनबद्ध पद्धतीने काम कसे करावे? याचे शिक्षकांना नियमित मार्गदर्शन मिळते.

४.वेगवेगळ्या सर्वेक्षणामध्ये शिक्षक, मुख्याध्यापकांना आपल्या भूमिका सहज समजण्यास मदत होते.

५.वेगवेगळी Online प्रशिक्षणे कसे सुरु करावे? पूर्ण कसे करावे? याविषयी शिक्षक व मुख्याध्यापकांना सहज मदत होते.

६.PFMS सारखी नवीन संकल्पना शाळांपपर्यंत पोहोचवण्यात सहज मदत झाली.

७.Student Portal, U -DISE , विद्यांजली या व इतर विविध बाबींविषयी शिक्षक व मुख्याध्यापकांना सहज मदत करता येते.

८.शिक्षण विभागातील कोणताही संदेश कमी वेळेमध्ये व्यापक समूहामध्ये पोहोचण्यास फक्त शिक्षण युट्युब चॅनेलची नेहमीच मदत होते.

**शालेय नेतृत्वासाठी मोड्युलची उपयुक्तता--**

- आपण काल शिकवत होतो तसंच आजही शिकवत राहिलो तर आपण आपल्या मुलांपासून त्यांचा भविष्यकाळ हिरावून घेऊ असे जॉन ड्यूईचे विचार कोरोना काळात योग्य वाटतात .शैक्षणिक दर्जात सुधारणा घडवणारी आणि विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाच्या पलीकडे नवीन माहिती देणारी ही आनंददायी पद्धती आहे.
- या मोड्युलमध्ये YouTube च्या माध्यमातून व्हिडिओद्वारे अडचणी सोडविण्याचा उत्तम प्रयत्न सुरू आहे . त्यामुळे थोडक्यात ई लर्निंग चे महत्व अधोरेखित झाले आहे.
- विविध शासन निर्णय शैक्षणिक कार्यक्रम उपक्रम परिपत्रके यांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी मार्गदर्शक व्हिडिओ तयार करणे त्यासाठी मार्गदर्शक सूचना उदाहरणे संदर्भ यांचा वापर करणे या बाबी या मॉड्युल मध्ये मांडल्या गेलेल्या आहेत .त्यातून अनेक संबोध संकल्पना शासन निर्णय उपक्रम यांच्याबाबत सविस्तर माहिती व्हिडिओ मधून प्राप्त होते.
- शालेय अभ्यासक्रमातील संबोध संकल्पनांबाबत विविध व्हिडिओ स्वतः तयार करणे सहकारी शिक्षकांना प्रेरणा देऊन त्यांचे कडून असे व्हिडिओ तयार करून घेणे अशा कृतींसाठी हे मॉड्युल निश्चितपणे मार्गदर्शक ठरेल ज्यामुळे शिक्षकांचा आत्मविश्वास वाढ वाढवून अध्ययन प्रक्रिया सुकर होण्यास मदत होईल
- वरच्या वर्गातील कल्पक तंत्रस्नेही विद्यार्थ्यांसाठी शालेय नेतृत्व असे पाठ्यक्रमावर आधारित शैक्षणिक व्हिडिओ तयार करण्यासाठी प्रेरणा घेऊन एकविसाव्या शतकातील कौशल्यांसह विद्यार्थी शिक्षक तयार करण्यासाठी मार्गदर्शन करू शकतील.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार या मॉड्युलचे महत्व .....**

पृष्ठ 78 मुद्दा क्रमांक 23 मध्ये 23.1 नुसार तंत्रज्ञानाचा वापर आणि एकात्मिकरण माहिती व संचार तंत्रज्ञान या क्षेत्रांमध्ये भारत जागतिक पातळीवर नेतृत्व करत आहे. डिजिटल भारत मोहिमेमुळे शिक्षणात महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल व शैक्षणिक प्रक्रिया आणि निष्पत्ती यामध्ये सुधारणा करण्यामागे तंत्रज्ञानाचा मोठा वाटा असेल. अशाप्रकारे तंत्रज्ञान आणि शिक्षणामधील संबंध सर्व स्तरांवर दोन्ही बाजूंनी काम करतील .23.3 नुसार शिक्षणाच्या अनेक पैलूंमध्ये सुधारणा करण्यासाठी तंत्रज्ञानाच्या वापराला आणि एकात्मिकरणाला पाठिंबा देऊन त्यांचा अवलंब केला जाईल. 23.5 नुसार तंत्रज्ञानाच्या वापराचा भर प्रामुख्याने अध्यापन अध्ययन आणि मूल्यांकन प्रक्रिया सुधारणे, शिक्षकांना सहकार्य करणे सहाय्य करणे .24.3 नुसार प्रभावी ऑनलाइन प्रशिक्षक होण्यासाठी शिक्षकांना योग्य प्रशिक्षण आणि विकासाची गरज आहे .ऑनलाइन शिक्षणाचा अनुभवात्मक आणि उपक्रम आधारित शिक्षणाशी मेळ घातला जात नाही तोपर्यंत ते केवळ स्क्रीन आधारित शिक्षण बनण्याची शक्यता आहे.

## सारांश -

आजच्या तंत्रज्ञानाच्या युगामध्ये परंपरागत अध्ययन -अध्यापन पद्धती अथवा परंपरागत अध्ययन - अध्यापन पद्धतीचे साधने ही कालबाह्य होत आहेत. बदलत्या परिस्थितीनुसार शिक्षकांनी बदलणे गरजेचे आहे. या विचारातून आणि कोरोनाच्या परिस्थितीतून 'फक्त शिक्षण' हे यूट्यूब चॅनल सुरू केले. या चॅनलला विद्यार्थी, शिक्षक, पालक, मुख्याध्यापक आणि अधिकारी वर्ग यांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. लाखो जणांनी लाभ घेतला. आतापर्यंत जे विविध व्हिडिओ चॅनलवर अपलोड केले त्या व्हिडिओ संदर्भामध्ये खूप मोठ्या प्रमाणावर सकारात्मक प्रतिसाद प्राप्त होतात. ही नक्कीच प्रेरणादायी बाब आहे. विशेष म्हणजे शैक्षणिक व्हिडिओ तयार करण्याचे हे सर्व काम कार्यालयीन वेळेशिवाय आणि सुट्टीच्या दिवशी केले जाते. हे काम करत असतांना

गटशिक्षणाधिकारी घनसावंगी, शिक्षणाधिकारी जि. प. जालना, जालना जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य, अधिव्याख्याता, राज्यातील सर्व अधिव्याख्याता, विषय साधनव्यक्ती, राज्यातील सर्व शिक्षक, विद्यार्थी आणि पालक सर्वांकडून नेहमीच प्रेरणा आणि प्रोत्साहन मिळते. या प्रेरणा आणि प्रोत्साहनातून श्री जगदाळे सतत नवनिर्मितीची स्फूर्ती मिळत राहते. ती निरंतर मिळत राहो आणि त्यांच्याकडून राज्याची डिजीटल सेवा होत राहो.

**समारोप..**

आतापर्यंत कधीही न केलेला अभिनव प्रयोग आपल्यासमोर या मॉड्युल मार्फत ठेवण्यात आला ज्यात राज्य शासनामार्फत शालेय शिक्षणात गुणवत्ता विकासासाठी नवनवे उपक्रम कार्यक्रम परिपत्रके शासन निर्णय यांच्यामार्फत अंमलबजावणी होत असते .मात्र काही वेळा अंमलबजावणी होताना विद्यार्थी शिक्षक मुख्याध्यापक पर्यवेक्षीय यंत्रणा या स्तरांवर अडचणी येतात अशा अडचणींवर मात करण्यासाठी अशा प्रकारचे व्हिडिओ YouTube च्या चैनल मार्फत एकाच वेळी संपूर्ण राज्यात पोहोचत आहेत त्यामुळे अंमलबजावणीतील अडचणी दूर होऊन योग्य परिणामांसाठी निश्चितच हे व्हिडिओ उपयुक्त होत आहेत म्हणजेच YouTube च्या माध्यमातून शैक्षणिक कार्यक्रम यशस्वी करण्याचा त्यातील अडचणी सोडविण्याचा चांगला मार्ग आहे असे निश्चितपणे सांगता येईल. अशाप्रकारे तंत्रज्ञानाच्या उपयुक्त वापरातून मुख्याध्यापक शिक्षक व विद्यार्थी यांच्यात शिकण्याची आवड निर्माण करता येते.

**संदर्भ ग्रंथ –**


१.शालेय नेतृत्व विकास कार्यक्रम पूरक वाचन साहित्य जानेवारी २०१८ महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था, औरंगाबाद

२.राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०

३.दैनिक सकाळ, संपादकीय दि.१८ फेब्रुवारी २०२२

४.महाराष्ट्र टाईम्स दि.२४ सप्टेंबर २०२०

५. https://diksha.gov.in/

6. http://ncsl.niepa.ac.in/

7. https://maa.ac.in/index.php?tcf=home



| मोड्यूल विकसक | समन्वयन | मार्गदर्शक |
|---|---|---|
| श्री.दादाभाऊ जगदाळे<br>विषय साधनव्यक्ती<br>गटसाधन केंद्र घनसावंगी<br>जि.प.जालना. | डॉज्योती कुलकर्णी.<br>समन्वयक<br>महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा), औरंगाबाद | श्रीरमाकांत काठमोरे.<br>संचालक<br>महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा),औरंगाबाद |